खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### नवीन मतदार नोंदणी अभियान

**प्रभात**

# पहिल्या दिवशी २४७ नवमतदारांची नोंदणी



**राजगुरूनगर, दि. २४ (प्रतिनिधी)** - शासन आपल्या दारी अभियान अंतर्गत मतदार नोंदणी अभियानात शनिवारी (दि. २४) पहिल्या दिवशी २४७ नवीन मतदारांनी मतदार नोंदणी केली, अशी माहिती राजगुरूनगरचे मंडल अधिकारी सविता घुमटकर, तलाठी बबन लंघे यांनी दिली.

शासन आपल्या दारी अभियान अंतर्गत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी खेड, सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार खेड यांच्या वतीने हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर येथे मतदार नोंदणी अभियान राबविण्यात आले. या अभियानात मतदान केंद्रावरील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित राहून नवीन मतदार नोंदनीसाठी याठिकाणी मतदार नोंदणी व मार्गदर्शन शिबिराचे घेण्यात आले. यावेळी अप्पर तहसीलदार नेहा शिंदे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक हिरामण सातकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रबंधक कैलास पाचारणे, विठ्ठल दौडकर, मंडल अधिकारी राजगुरूनगर सविता घुमटकर, राजगुरूनगर तलाठी बबन लंघे, मनिषा राऊत, कडधे तलाठी रवींद्र केंगले यांच्यासह राजगुरुनगर परिसरातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी अप्पर तहसीलदार डॉ. नेहा शिंदे यांनी नव मतदार विद्यार्थी यांना मार्गदर्शन केले. मतदार यादीमध्ये नाव समविष्ट करण्याचे आवाहन केले.

PuneDistrict, 25 June 2023, Page:011
https://epaper.dainikprabhat.com



# खेडमधील राजगुरू महाविद्यालयात नवमतदार नोंदणी अभियान

**राजगुरुनगर :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि उपविभागीय कार्यालय खेड, तहसील कार्यालय खेड, नगरपरिषद राजगुरुनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'शासन आपल्या दारी : नवमतदार नोंदणी' अभियानाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २४७ नवमतदारांची नोंदणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक हिरामण सातकर पाटील होते. याप्रसंगी अपर तहसीलदार नेहा शिंदे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गणेश धुमाळ, डॉ. प्रभाकर जगताप, मंडलाधिकारी सविता घुमटकर, तलाठी बबन लंघे, मनीषा राऊत, रवींद्र केंगले तसेच द. मा. पिंगळे व राजगुरुनगर परिसरातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी १ जानेवारी २०२४ पर्यंत वयाची १८ वर्षे पूर्ण होत असलेल्या मतदारांची नाव नोंदणी सहज आणि सोपी व्हावी यासाठी मतदार नोंदणी मोहिमेचे आयोजन करण्यात आले. नव मतदारांना प्रशिक्षण बबन लंगे व त्यांच्या समवेत प्रशिक्षक व अधिकारी वर्ग यांनी दिले. अप्पर तहसीलदार नेहा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीचे महत्त्व सांगून मार्गदर्शन केले. संचालक हिरामण सातकर पाटील यांनी येत्या १ जानेवारीपर्यंत वयाची १८ वर्ष पूर्ण होत असलेल्या विद्यार्थ्यांना मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याचे आवाहन केले. मागील शैक्षणिक वर्षात हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाने नवमतदार नाव नोंदणीसाठी उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल अप्पर तहसीलदार नेहा शिंदे यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख